I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 232-237

A Double-Blind Peer Reviewed Journal

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मानवाधिकार आणि स्त्रीवादी साहित्य

प्रा.सतीश सहदेवराव कर्णासे

मराठी विभाग प्रमुख

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

प्रत्येक व्यक्तीला जन्मजात काही हक्क मिळालेले असतात. मानवाधिकार ही विसाव्या शतकामध्ये उदयास आलेली संकल्पना आहे. सज्ञान स्त्री–पुरुषाला स्वत:च्या विचारानुसार विवाह करण्यात त्याचा हक्क आहे. राज्यघटनेनुसार प्रत्येक व्यक्तीला प्राथमिक शिक्षण मिळविण्या हक्क आहे. आहेप्रत्येक व्यक्तीला विचार सद्सद्विवेकबुद्धी आणि धर्म यांच्या स्वातंर्त्याचा हक्क आहे महात्मा फुले यांनी आपल्या कार्याची सुरुवात स्त्री शिक्षणापासून केली. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचे ध्येय समाज सुधारकांनी मनाशी बाळगले. मराठी साहित्यात स्त्रियांचे स्थान मानाचे आहे. आधुनिक काळातील स्त्रीला आत्मभान आल्यामुळे जीवनातील विविध पातळीवर, पातळीवरील संघर्ष करीत, ताणतणावांना तोंड देत खंबीरपणे लढावे लागले. आधुनिक काळामध्ये स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात स्त्रियांवर लेखन केले आहे. वेगवेगळे साहित्य अभ्यासून कविता लेखन, कादंबरी लेखन ,कथालेखन, नाट्यलेखन केलेले आहे.

**बीजशब्द :** मानवाधिकार, प्रतिष्ठा, कलम, विवाह, पुनर्विवाह, स्त्री–पुरुष, शिक्षण, अधिकार, समानता, राजकीय, आर्थिक, धार्मिक, कर्तुत्व.

**प्रस्तावना:**

प्रत्येक व्यक्तीला जन्मजात काही हक्क मिळालेले असतात असे मानले जाते. त्यांना नैसर्गिक हक्क, मूलभूत हक्क, मानवी हक्क, घटनात्मक हक्क,नैसर्गिक हक्क अशा वेगवेगळ्या प्रकारांनी संबोधले जाते, मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जन्मत:, निसर्गत: मिळालेले हक्क. माणूस म्हणून व्यक्तीच्या समग्रह विकासासाठी, त्याचे जीवन सुखाने, आनंदाने जगण्यासाठी, मानवी मूल्यांचा जपणुकीसाठी व संवर्धनासाठी, जे हक्क आवश्यक आहेत ते 'मानवी हक्क' या संकल्पनेत मोडतात. माणसाचे जीवनमान,स्वातंत्र्य व प्रतिष्ठा हा मानवाधिकाराचा गाभा आहे. मानवाधिकार ही विसाव्या शतकामध्ये उदयास आलेली व जगभरामध्ये वेगाने मान्यता पावलेली संकल्पना आहे. सामाजिक चळवळींनी मानवाधिकाराच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे.

**विवाहाचा अधीकार :–**

कलम १६व कलम २३ नुसार सज्ञान स्त्री– पुरुषांना स्वत:च्या विचारानुसार विवाह करण्याचा हक्क आहे. महात्मा फुले यांनी बालविवाह, जरठकुमारी विवाह यांना विरोध केला. विधवा पुनर्विवाह तसेच आंतरजातीय विवाह यांचा पुरस्कार केला. फुल्यांनी १८६० साली शेनव जातीतील एका विधवेचा पुनर्विवाह घडवून आणला. स्त्रियांना वर निवडण्याचा अधिकार असावा असे सत्यशोधकांचे मत होते. सत्यशोधकीय साहित्यामधून बाल विवाहाला प्रखर विरोध केलेला आढळतो. शांताबाई चव्हाण यांनी 'नव्या मनूतील आर्य स्त्री विवाह' या लेखात बालविवाह, जरठकुमारी विवाह यांचे स्त्रियांच्या शरीरावर व मनावर होणारे अनिष्ठ परिणाम स्पष्ट करून विवाह समयी मुलींचे वय १८ वर्षे पूर्ण असण्याचा कायदा करण्यासाठी मागणी केली आहे. (राष्ट्रवीर,८ ऑक्टोबर ३ डिसेंबर १९२९), श्रीपतराव शिंदे (विजयी मराठा), नारायण मेघाजी लोखंडे (दीनबंधू), भगवंतराव पाडेकर( जागृती), के. सी. ठाकरे (प्रबोधन) इत्यादींनी बालविवाहास विरोध, विधवा पुनर्विवाह या बाबतीत सातत्याने लेखन करून लोकजागृती करण्याचे काम केले. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास पाठिंबा दिला. मुलींना वरसंपत्तीचा, स्वयंनिर्णयाचा अधिकार पाहिजे असे ठाकरे यांनी मांडले आहे.( प्रबोधन, १६ डिसेंबर १९२३)

सारांश, सत्यशोधक चळवळीने मानवी हक्क जाहीरनाम्यात नमूद केलेल्या स्त्री–पुरुषांच्या वैवाहिक अधिकाराला प्रत्यक्षात आणण्यासाठी सामाजिक पातळीवर प्रयत्न केले होते.

**शिक्षणाचा अधिकार :–**

कलम २६ व कलम १३ व १४ तसेच कलम २१ व कलम ४५ व ४१ नुसार प्रत्येक व्यक्तीला सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण मिळण्याचा हक्क आहे. शिक्षण देण्याची जबाबदारी राज्यावर आहे.

महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीने प्राथमिक शिक्षणावर सर्वाधिक भर दिला. शिक्षण हे वंचित जनसमूहांच्या मुक्तीचा क्रांतीमंत्र म्हणून मांडले. श्रमिक

जनसमूहांच्या दारिद्रयाचे व शोषणाचे मूळ व ध्यानात असल्याचे सत्यशोधकांनी दाखवून दिले. महात्मा फुले यांनी 'हंटर कमिशन' कडे पुढील निवेदनात सरकारने कनिष्ठ वर्गासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची मागणी केली. त्यांनी झीरपण्याच्या सिद्धांताला विरोध केला. लोकल फंड व शिक्षणकराचा पैसा शेतकऱ्यांचे शिक्षणावर खर्च करावा, खेड्यपाड्यतून शाळा उघडाव्यात, ब्राह्मणेतर शिक्षक नेमावेत, मुलांना प्रोत्साहन बक्षिसे द्यावीत अशी मागणी त्यांनी केली.' विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले' या प्रमेयात महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी स्वत: शिक्षणप्रसाराचे कार्य आयुष्यभर केले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर मध्ये २१वसतिगृहे सुरू केली. मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा१९१७ साली केला. मराठा शिक्षण परिषद, रयत शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था, इत्यादी संस्थांची स्थापना सत्यशोधकीय प्रेरणेतून झाली. 'दीनबंधू','दिनमित्र', 'शेतक.यांचा कैवारी', 'जागृती', 'विजयी मराठा', 'राष्ट्रवीर','ब्राह्मणेतर','हंटर'इत्यादी सत्यशोधकीय नियतकालिकांनी प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आणला. लोक जागृती केली. प्रत्येक गावात शाळा, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे, विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, बक्षिसे, अभ्यासक्रमाची पुनर्रचना अशी शिक्षणविषयक भूमिका सत्यशोधक चळवळीने घेतली. शिक्षण हा प्रत्येकाचा मानवाधिकार असल्याचे प्रतिपादन केले.

**विचारव धर्मस्वातंत्र्याचा अधिकार :—**

कलम १८नुसार तसेच कलम १५ ते २८ नुसार प्रत्येक व्यक्तीला विचार सदविवेकबुद्धी आणि धर्म यांच्या स्वातंत्र्याचा हक्क आहे. तसेच आचरण, उपासना, श्रद्धा, शिकवण यांचे स्वातंत्र्य आहे.

भारतीय समाजात वैदिक धर्माचे प्राबल्य होते. धर्मशास्त्रे व रूढी परंपरा यांची बंधने लोकमानसावर होती. पुरोहितशाही, भिक्षुकशाही यांनी धर्मसंस्थेचा ताबा घेतला होता. त्यामुळे विचार व धर्मस्वातंत्र्याचामागमूसही मध्ययुगीन काळात आढळत नाही. धार्मिक कट्टरवाद, कर्मठता, कर्मकांड, धर्मगुरूंची दादागिरी शिगेला पोहोचली होती. धर्माविषयी स्वतंत्र किंवा वेगळा विचार करण्यास बहिष्कृत केले जात असे किंवा शिक्षा दिली जात असे. धर्मसंस्थेने मानवी जीवन झाकोळून गेले होते. या विरोधात महात्मा फुले व सत्यशोधक समाजाने विद्रोह पुकारला. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर उद्देश होता की ब्राह्मण, भट, जोशी इत्यादी लोकांच्या दहशतवादापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी धर्माच्या आधारे हजारो वर्ष ते शूद्र लोकांस लुटीत आले आहेत. यावरून असे लक्षात येते की सत्यशोधक समाजाने धार्मिक स्वातंत्र्यासाठीलढा पुकारला होता. प्रत्येक व्यक्तीस आपले धर्मविधी स्वत: करण्याचा हक्क आहे असा त्यांचा आग्रह होता.

**स्त्री आणि पुरुषांना समान हक्क :—**

क्लम ३ नुसार सर्व नागरिक राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क पुरुष आणि स्त्रियांना समान आहेत. महात्मा फुले यांनी आपल्या कार्याची सुरुवात स्त्रीशिक्षणा पासूनच केली. स्त्री ही सर्वाधिक गुलाम शोषित असल्याचे फुले यांचे मत होते. म्हणून त्यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी विविध स्तरावर प्रयत्न केले. स्त्री आणि पुरुषांमध्ये स्त्रीला श्रेष्ठ मानले. दोघांचे मानवी अधिकार समान मानले. स्त्रियांच्या संदर्भात पक्षपात करणारी पुरुषप्रधान व्यवस्था व धर्मग्रंथ यांचे वाभाडे काढले. त्यांच्या लेखनामध्ये स्त्रीला प्रथम स्थान दिल्याचे आढळते. स्त्री आणि पुरुष हे उभयता जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र आहेत. पती—पत्नीस वजा करून त्यांनी एकमेकांबरोबर बहीण भावंडांप्रमाणे आचरण करावे असे त्यांचे विचार होते. फुलेच्यातालमीतून ताराबाई शिंदेच्यासारखी आद्य स्त्री लेखिका निर्माण झाली. ताराबाईंनी 'स्त्री पुरुष तुलना' (१८८३) या ग्रंथात पुरुषप्रधान संस्कृती, देवधर्मव्यवस्था, पुरुषी मानसिकता, दांभिकता यांची चिरफाड करून स्त्रियांच्या गुलामगिरीची मीमांसा केली आहे. स्त्री—पुरुष समतेचा क्रांतिकारी मार्ग सांगितला आहे.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कायदे मंत्री झाले. भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे काम, मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केले. घटनेची बांधणी समता, स्वातंर्त्य, न्याय व बंधुता या चार मुलंतत्वांवर झालेली आहे. पहिले तत्व समता जी भारतीय जीवनात कधीच नव्हती. हजारो वर्षे विषमतेची परंपरा चालत आलेली होती व भारतीयांच्या रक्तकणात आत्मसात झालेली होती. त्यामुळे समतेवर आधारित स्वातंर्त्याची आशा करणे व्यर्थ होते. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादी मुळे व्यक्तीचे होणारे मूल्यमापन अधिकाधिक जाचक होत होते. त्यामुळे हा जाच कायद्यानेच नष्ट करण्याची गरज कंपनीहोती आणि कायदा सर्वांनाच सारखा लागू होईल हेही सांगणे आवश्यक होते. म्हणून संविधानाच्या १४ व्या कलमात हे सांगून टाकले की कोणत्याही भारतीय व्यक्तीस भारताच्या राज्य क्षेत्रात

कायद्यापुढे समान किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारण्यात येणार नाही.

कलम १५—१ राज्य केवळ धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही. १५—२ सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे, १५—३ कलमात स्त्रिया व बालके यांच्याकरिता विशेष तरतुदींचा उल्लेख आलेला आहे.

१६—१ व २ सेवायोजन पदनियुक्ती, नोकरी इत्यादी धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान, निवास इत्यादी कारणांवरून भेदभाव केला जाणार नाही व सर्व नागरिकास समान संधी मिळेल. या कलमांचा स्त्री जीवनावर काय परिणाम झाला हे पाहणे आवश्यक आहे. लिंगभेद यामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहे. कारण परंपरेचा कायदा आजही प्रभावी आहे. पण आज स्त्रीमुक्ती संघटना ह्या अत्याचाराविरूद्ध लढत आहे. विशेषत: स्त्रियांनीही बाजू कणखरपणे सांभाळल्यामुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटलेले दिसते. स्त्रीमुक्ती बरोबरच स्त्रीवादाचा आग्रह स्त्री संघटनांनी धरलेला दिसतो.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचे ध्येय समाज सुधारकांनी मनाशी बाळगले. जुन्या रूढी, अन्यायी परंपरा, अत्याचाराला बळी पडलेली स्त्री सर्व बंधनातून मुक्त व्हावी यासाठी एक वाटचाल सुरू झाली. प्रत्येकाला बुद्धिप्रामाण्यवादी स्वातंत्र्य देणे, अन्यायातून मुक्त करणे हा परोपकारी धर्म आहे, अशी समजूत सुधारकांनी समाजाला दिली. त्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान होते आणि ते काही प्रमाणात आजही दिसून येते. पितृसत्ताक पद्धती रूढी असल्यामुळे मुलीला 'परक्याचे धन' असे मानून तिचे क्षेत्र चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले होते. स्त्रियांकडे पुरुषांचा पाहण्याचा दृष्टिकोन एक उपभोग्य वस्तू असाच होता. चातुर्वर्णव्यवस्थेतून स्त्रियांना मिळणारी वागणूक अन्यायाची होती. समाजातील अन्याय दूर करून स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी समाजसुधारक पुढे आले. समाजधुरी नांच्या यशस्वी कार्यामुळे स्त्री शिक्षणाची संधी स्त्रियांना मिळाली १९६० नंतर विविध रूपाने साहित्य प्रवाह निर्माण झाले या साहित्य प्रवाहामध्ये 'स्त्रीवादी साहित्य' हा साहित्य प्रकार नव्याने सुरू झाला. स्त्री—पुरुष तुलनेचे, भेदभावाचे जे चित्रण वाङ्मयात होत आले आहे. त्या पुरुषकेंद्री चौकटीतून स्त्रियांबद्दलची जी भावना त्यांभावनांचा नव्याने शोध घेणे हे 'स्त्रीवादी साहित्या'तून दिसून येते.

शिक्षणाचा अधिकार जेथे नाकारलेला होता, तेथे शिक्षणाची काय प्रगती झाली विशेषत: स्त्रियांच्या शिक्षणाची काय प्रगती झाली तिचा आलेख दहा दहा वर्षांचा हे स्पष्ट करतो की स्त्रियांची शिक्षणातील प्रगती दिवसेंदिवस वाढती दिसत आहे. एकूण शैक्षणिक क्षेत्रात स्त्रिया गुणवत्तेच्या बाबतीत पुरुषांना मागे टाकत असल्याचे चित्र आज दिसत आहे. विकासाची समान संधी मिळताच स्त्रिया कोणत्याही आघाडीवर काम करू शकतात.

जेव्हा स्त्रिया लिखाणातून स्वत:चे सत्व शोधण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांचे साहित्य पुरुषांच्या साहित्य होऊन वेगळे ठरते. स्त्रियांच्या साहित्यातील हा वेगळेपणा शोधून त्याची चिकित्सा करण्याचे कार्य गेल्या काही वर्षात स्त्री समीक्षकांनी केले आहे. स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून, कथांतून, कवितांतून त्यांच्या स्वत्वाचा शोध त्यांनी कसा घेतला आहे, त्याची जाणीव त्यांना कशी झाली आहे, वर्षानुवर्षे आपण दडपले गेलो असल्याचे भान त्यांनी कसे व्यक्त केले आहे याचा शोध घेणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा असे म्हणतात येईल. स्त्रियांचे साहित्य पुरुषांच्या साहित्यापेक्षा वेगळे असते का, असल्यास का व कुठे असते याचाही विचार स्त्रीवादी समीक्षा करते. स्त्री आणि पुरुष यांच्या लेखनात निश्चितपणे वेगळेपण असते असे गृहीत धरण्याकडे या समीक्षेचा बव्हंशी कल असतो. कित्येकदा तर स्त्री पुरुषांच्या जगाकडे पाहण्याच्या दृ ष्टीतच मूलभूत फरक असतो, असा आग्रह ही समीक्षा धरते. इतकेच नव्हे, तर परंपरेने स्त्री व पुरुषांकडे सोपवलेल्या भूमिकांमुळे व व्यवसायामुळे ही स्त्री—पुरुषांच्या लेखनातला भेद निर्माण होतो, असेही मानले जाते. स्त्रियांच्या लेखनाकडे साकल्याने पाहिले तर त्यातून विशिष्ट विषय, समस्या व बंध एवढेच नव्हे तर प्रतिमाही फिरून फिरून आढळतात याविषयी काही समीक्षकांचे एकमत आहे .परंतु या मताला विरोधही झाला आहे. शोवॉल्टर च्या मते स्त्री—पुरुषांच्या दृष्टिकोनातील मूलभूत फरकामुळे हा वेगळेपणा निर्माण होत नसून प्रत्येक काळातील प्रभाव घटकांमुळे असा फरक पडतो.स्त्रीविशिष्ट अनुभवाच्या वेगळेपणाच्या जाणिवेमुळे हे साहित्य स्त्रीवादी ठरत नाही, असे मानणाऱ्या स्त्रीवादी समीक्षकही आहेत. या विशिष्ट दृष्टिकोनांकडे पाहिले म्हणजे स्त्रीवादी साहित्य या वेगळ्या वर्गीकरणाचे उद्देश लक्षात येतात व स्त्रीवादी साहित्य या संकल्पनेची अगदी व्याख्या जरी करता नाही आली तरी तिची कक्षा लक्षात येऊ शकते. आणखीही एक गोष्ट यावरून स्पष्ट होते ती म्हणजे स्त्रीवादी साहित्य या संज्ञेचा अर्थ. ज्यात स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण आहे ते साहित्य. म्हणजेच स्त्रीवादी साहित्य. स्त्रियांचे

I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 232-237
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

स्वत:संबंधीचे साहित्य ज्यातून स्वत:चा शोध घेतला आहे आणि जे स्वतहाच्या जाणिवेने लिहिलेले आहे असे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य.

मराठी साहित्यात स्त्रियांचे स्थान मानाचे आहे. फक्त ही पुरुषप्रधान व्यवस्था त्यांची दखल घेत नाही. त्यांचे महत्त्व समजून घेत नाही. कारण या व्यवस्थेला असं वाटतं की, हे जे सगळं स्त्रियांकडून लिहिल जात आहे, ते सारं आपल्या विरुद्ध आहे. हे केलेलं त्यांच विश्लेषण होय. स्त्रियांच्या लेखनाविषयी का लिहिलं जात नाही? तर याची कारणं बघता सगळे इतिहास लिहिणारे हे पुरुष आहेत. ते स्त्रियांची दखल का घेत नाहीत? स्त्रियांना साहित्यात मानाचे स्थान का देत नाहीत? तर या विषयी माझं विश्लेषण अस आहे की, त्यांना आतून भीती वाटते. हे जे स्त्रियांकडून सगळे लिहिले जाते आहे, ते सगळे आपल्या विरुद्ध आहे. ते आपल्यातल्या एका कुण्या पुरुषा विरुद्ध नाही तर सर्व पुरुषांविरुद्ध ते आहे. पुरुषांचे जे काही सत्तास्थान आहे त्यालाच या स्त्रीया धक्का लावत आहेत, त्याला आव्हान देत आहेत, असे त्यांना वाटते आणि अशावेळी त्यांच्या ठाई जी अस्वस्थता निर्माण होते त्यातून आपोआपच स्त्रियांचा अनुल्लेख या पुरुषांकडून होत जातो. त्यांचा स्वतंत्र उल्लेख केला जात नाही.

मराठी साहित्य ज्यांचे लेखन कर्तृत्व अतिशय महत्त्वपूर्ण आहे. उदाहरणार्थ काशीबाई कानिटकर, गीता साने, विभावरी शिरुरकर इ. विभावरी शिरुरकर ह्या सामान्य लेखिका नव्हत्या. त्यांनी ज्या वेळी साहित्य निर्माण केलं त्यावेळी त्यांना अनेक प्रश्न समीक्षकांनी, पुरुषांनी विचारले आणि त्या काळी अक्षरश: शेकडो लोक त्यांच्यावर तुटून पडलेत. कोणी ही विभावरी बाई? किती अनैतीक लिहिते? किती अश्लील लिहिते? तिला काय म्हणायचे आहे?म्हणजे अशाप्रकारे तुमच्या संस्कृतीने आणि तुमच्या व्यवस्थेने दिलेल्या अलिखित म्हणा किंवा मनुप्रणित –लिखित नियम म्हणा, याविरुद्ध जर एखादी स्त्री बोलत असेल, त्या नियमांना ती कुठेतरी आव्हान देत असेल, त्या नियमांविरुद्ध जर ती प्रश्न विचारीत असेल तर ही व्यवस्था, ही चौकट, ही संस्कृती, तिच्यावर अक्षरश: तुटून पडते, हे वास्तव आहे.

इंदिरा संत ह्या पतिनिधनानंतर एकाकी झाल्या आणि त्यानंतर त्यांनी आपल्या एकाकीपणाच्या दु:खावर, पतीच्या विरहावर आपली संबंध कविता लिहिली. म्हणजे एखादी स्त्री जेव्हा एकटी होते त्यावेळी त्याच्या विरहाच्या, त्याच्या प्रेमाच्या, त्याच्या स्वप्नांच्या आणि त्याच्या दु:खाच्या आठवणी जेव्हा ती कवितेतून काढते तेव्हा तिचे काव्य गौरविले जाते.

जिथे स्त्रीचे समर्पण आहे तिथे पुरुषांची दाद आहे! असे हे सारे विश्लेषण आपल्याला करता येईल. आणि आज विश्लेषण असे केले जात आहे. स्त्रीवादाने आणि स्त्रीवादयांनी अतिशय विलक्षण अशा प्रकारे पुरुष मानसिकतेचा विचार केला आहे, प्रश्न विचारणाया स्त्रिया त्यांना रुचत नाहीत. अशा स्त्रियांचे चित्रण मुळी होत नाही, तर अतिशय सुंदर, सुखद, पुरुषांना गोंजारणारी, पुरुषांच्या संवेदनांना कुठेतरी फुलवणारी आणि त्यांना गुदगुल्या करणारी जी स्त्री आहे ती त्यांना हवीहवीशी वाटते. त्याच दृष्टिकोनातून हे पुरुष लेखक तिचे चित्रण करीत असतात. तसे वलयही तिच्याभोवती निर्माण करीत असतात. गौरी देशपांडे यासंदर्भात स्पष्टपणे आपले मत नोंदवताना 'एकेक पान गळावया' या सारख्या कादंबरीत लिहितात की, 'ठीक आहे मुलं जन्माला घातली'य पण मुलं जन्माला घातली याचा अर्थ त्या मुलांचे करण्यामध्ये सबंध आयुष्य घालावयाचे का? जीवनभर मी तेच करत बसायचे का? हे कशासाठी करायचे? म्हातारपणी ही मुले मला आधार देतील म्हणून तर मला ते नकोय! जसं जमेल तशी मी राहील. पण त्यामुळे मला कुण्या प्रियकराचा आधार पाहिजे असे देखील नाही. मला जमेल तसे मी माझं म्हातारपण काढेल. एकेक पान गळत गेल्यावर वृक्ष जसे ते सहन करत राहतो तसंच मी ते सहन करीन.' उतार वयातल्या एकाकी अवस्थेत मुलांवर अवलंबून राहणे किंवा कुठल्या पुरुषाचा आधार घेणे गौरी देशपांडेना नको वाटते. असे स्पष्टपणे मत नोंदवणाऱ्या गौरी देशपांडे जेवढ्य स्त्रियांमध्ये लोकप्रिय झाल्या तेवढ्य पुरुष इतिहासकारांमध्ये त्या झाल्या नाहीत. त्यांच्या लेखनाला पुरुष लेखकांनी हवी तेवढी दाद दिलेली नाही उलट त्यांच्यावर टीकाच केली.

गौरी देशपांडे यांच्या 'कारावासातून पत्रे', 'मध्यलटपटीत', 'निगराणी','चंद्रिका ग सारिके ग', 'दुस्तर हा घाट','आणि काही दूरपर्यंत' या त्यांच्या लघु कादंबऱ्या मधील नाईकांचे चित्रण म्हणजे आधुनिक वृत्तीच्या स्त्रीची स्वातंर्त्यसुखतेच होत. त्यांच्या 'थांग'(१९८६) या कादंबरीतून वयाची ५० वर्षे होईपर्यंत एकमेकांच्या जवळ राहिलेल्या पती–पत्नीला एकमेकांच्या मनाचा थांग लागलेला नाही. ही वस्तुस्थिती लेखिका निवेदन करते. त्यांच्या 'दुस्तर हा घाट' (१९९८) या कादंबरीतील नायिका नवऱ्यांच्या मित्राशी मोकळेपणाने वागताना त्यात काही वाईट आहे असे तिला वाटत नाही. तर 'उत्खनन'(२००२) या कादंबरीतील नायीका विवाहपूर्व संबंधातून गरोदर राहते व आपल्या मुलाला जन्म देऊन वाढवते. थोडक्यात गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील नायिका आत्मभान असलेल्या व स्त्रीविषयक जाणिवेचा स्वीकार करणाऱ्या असून व्यक्तीस्वातंर्त्य वादाच्या त्या पूरक

आहेत. हाच धागा प्रिया तेंडुलकर, सानिया व कलम देसाई, शांता गोखले व आशा बगे यांच्या कादंबरीतूनही दिसून येते.

प्रिया तेंडुलकर यांच्या 'ज्यांचा त्यांचा प्रश्न'(१९८५), 'जन्मलेल्या प्रत्येकाला'(१९९१), 'लग्न संपल्यावर जावे त्यांच्या वंशा' २०२० या त्यांच्या कादंबऱ्यास्त्री व्यक्तिमत्त्वाच्या स्वतंत्र अस्तित्वाचा शोध घेतात. अंबिका सरकार यांच्या 'एका श्वासाचं अंतर'(१९९०) या कादंबरीतून पुरुष प्रधान संस्कृती वाट्यला आलेली दुय्यम स्वरुपाची भूमिका हाच तिच्या जीवन संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. याकडे वाचकांचे लक्ष वेधतात. तर माधवी देसाई यांनी आपल्या 'मंजिरी', 'नियती'(१९८०) व 'हरवलेल्या वाटा' या कादंबऱ्यातूनस्त्रीच्या सहनशक्तीची व स्वत:मध्ये मुक्ती होण्याच्या शक्तीची चर्चा करतात. त्यामुळे त्यांच्या कादंबरीतील नायीका कोसळून पडत नाहीत तर सहनशीलतेच्या व त्यागाच्या बळावर उभ्या राहतात.

आधुनिक काळातील स्त्रीला आत्मभान आल्यामुळे जीवनातील विविध पातळीवरील संघर्ष करीत ताणतणावांना तोंड देत खंबीर पनाने जीवन जगताना दिसून येते. याचे चित्रण शांता मिसळ यांची 'बेघर'(१९७६ ̂), जाई निंबकर यांची 'सात'(१९९०), शांती योगी यांची 'परकी'(१९९०) व प्रतिभा रानडे यांची 'मानुषी'(१९८९) इत्यादी कादंबऱ्यातूनघडताना दिसून येते. शांता गोखले यांनी रिटा वेलणकर १९९० या कादंबरीतून स्त्रियांना पुरुष याशिवायही सुखी जीवन जगता येते हा आशय मांडलेला आहे

कविता महाजन यांच्या ' ब्र' आणि 'भिन्न' या कादंबऱ्यांमधून एक वेगळच विश्व मराठीत उभ केल आहे. आज आपण पाहतो की, स्त्रियांना आरक्षण दिले आहे, अनेक स्त्रिया राजकारणात पुढे सरसावत आहेत, आपल्याला माहित आहे की या स्त्रियांना सरपंच केलं जात आहे. विविध पद भूषवित आहेत: पण त्यांचे नवरे त्यांच्या आडून राजकारण खेळत असताना दिसते. मराठी किरण गुरव यांच्या 'राखीव सावल्यांचा खेळ' या कथेमध्ये आरक्षणातून सरपंच, नगरसेवक, आमदार होणा—या स्त्रिया या राखीव सावल्या आहेत आणि त्यांच्या पाठीमागे हे सगळे नवरे आहेत. 'ब्र' या कादंबरीत कविता महाजन यांनी यादृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण लेखन केल. आहे या कादंबरीत सरपंच बायकांविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून एखाद्या पदावरून त्यांना काढून टाकण्यासाठी कसे राजकारण केले जाते हे स्पष्टपणे मांडले आहे. कविता महाजन ही पहिली लेखिका आहे की, जिने ग्रामीण राजकारणाचे अत्यंत वास्तव वर्णन केले आहे.

अलीकडे या अतिशय महत्त्वाच्या काळात कवयित्री मोठ्या प्रमाणावर काव्यलेखन करीत आहेत. त्यामध्ये प्रज्ञा पवार, नीरजा, कविता महाजन आणि मल्लिका अमरशेख यांचा समावेश होतो. कविता महाजन यांच्या कवितासंग्रहाचे नावच 'धुळीचा आवाज' आहे. आज पर्यंत जी धुळ पायाखाली ठेवली गेली, पायाखाली चिरडली गेली, त्या जोडीला आज आवाज प्राप्त झाला आहे असं हे शीर्षक सांगतं.

मल्लिका अमर शेख यांनी 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' या तिच्या संबंध आत्मचरित्रामध्ये अगदी वेगळ्या पद्धतीने आपल्या संसाराचे चित्र रेखाटलेले आहे. बाहेरच्यांना वाटतं तितका हा संसार किंवा पतीच्या सहवासातील नवीन जीवन रम्य नाही आणि सुखद तर नाहीच नाही. 'वाळूचा प्रियकर' या कवितेतून त्यासंबंधीची अतिशय बोलकी प्रतिमा मलिका अमर शेख यांनी वापरली आहे. वाळूचा प्रियकर जो हळूहळू मुठीतून निसटत जातो, तो काहीच शिल्लक राहत नाही, ज्याला आपण ठेवलेलं असतं तो वाळू सारखा हातातून घसरत जातो, अशी ती प्रतिमा आहे. या चक्रात अडकलेल्या बायकांच्या आयुष्याचा एक खणखणीत आवाज मलिका अमरशेख यांनी काढला आहे. प्रज्ञा पवार, नीरजा, कविता महाजन आणि मल्लिका अमरशेख या अत्यंत महत्त्वाच्या कवयित्रींनी या काळातल्या कवींना अक्षरश: बाजूला सारून स्वत:चं स्वतंत्र असं एक स्थान सिद्ध केलंय.

वरील स्त्रियांच्या साहित्यावर समीक्षा किती पुरुषांनी लिहिलेली आहे? वास्तविक पाहता त्यांनी मानाचे स्थान मिळविले आहेच. फक्त ते कोणी कबूल करत नाही ही वस्तुस्थिती आहे.

**निष्कर्ष :**

१. माणसाचे जीवनमान, स्वातंत्र्य व प्रतिष्ठा हा मानवाधिकारांचा गाभाआहे.

२. प्रत्येक व्यक्तीला प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याचा हक्क आहे.

३. स्त्री—पुरुषांना स्वत:च्या विचारानुसार विवाह करण्याचा हक्क आहे.

४. लिंगभेद त्यामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहेत.

५. चातुर्वर्ण्यव्यवस्थेतून स्त्रियांना मिळणारी वागणूक अन्यायाची होती.

६. स्त्रियांनी आपल्या कादंबऱ्यांमधून कथांतून कवितांतून स्वत्वाचा शोध घेतला आहे.

७. मराठी साहित्य स्त्रियांचे स्थान महत्त्वाचे आहे. आहे.
८. अलीकडच्या काळात स्त्रिया कविता कथा कादंबरी मोठ्य प्रमाणात लिहीत आहेत.

**संदर्भ :**

'अक्षरगाथा' ,विशेषांक, अंक: चौथा, १० जानेवारी २०१४ , अर्चना माधवराव जाधव प्रकाशन, नांदेड.
'लोकराज्य', धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक, ऑक्टोबर २००६, पृ. १०८
आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता' डॉ. शंकर विभुते, सूर्य मुद्रा प्रकाशन नांदेड, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २०१५ पृ.१२९–१३०
'ग्रामीण, दलित आणि स्त्रीवादी साहित्य', डॉ शरयू तायवाडे,प्रथम आवृत्ती ३० जानेवारी २०१४